# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या २०३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## सोमवार, दि.२५ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११: ३० वा.

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०३ वी बैठक **सोमवार, दि.२५ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १७) | डॉ. उमेश काकडे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्रभारी कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १ ]</td><td>१) दि.२५ जुलै, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि.०८ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०२ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.</td><td>सभा व निवडणूका विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>दि.२५ जुलै, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>विषय क्र. ६ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.<br>पूर्वीचा ठराव<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात यावी व विद्यापरिषद सदस्य यांची व्यासपीठासमोरील मंडपामध्ये अग्रस्थानी बैठक व्यवस्था करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>दुरुस्त केलेला ठराव<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावर बैठक व्यवस्था क्रम ठरविण्याबाबत खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th><th>पदनाम</th></tr>
<tr><td>१.</td><td>श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>श्री. सुधाकर तुकाराम सरवदे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४.</td><td>डॉ. अतुल लकडे</td><td>सदस्य-सचिव</td></tr>
</table>
तसेच विद्यापरिषद सदस्य यांची पूर्वीच्या ठरावाप्रमाणे व्यासपीठासमोरील मंडपामध्ये अग्रस्थानी बैठक व्यवस्था राहील.</td><td>परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग</td></tr>
<tr><td></td><td>विषय क्र. १६ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.<br>पूर्वीचा ठराव<br>हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सामंजस्य (MoU Draft) करारास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>दुरुस्त केलेला ठराव<br>हॉकी सोलापूर सिटी & डिस्ट्रीक्ट मेन ॲण्ड वुमन हॉकी असोसिएशन सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात हॉकी व बहुउद्देशीय क्रिडा प्रकार मैदान व त्याला लागणारे सुविधा (रुम, पॅवेलियन इत्यादी) बांधण्यासंदर्भात होणाऱ्या सामंजस्य (MoU Draft) करारास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td>क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | विषय क्र. १७ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व AIU आयोजित विविध क्रीडा स्पर्धा, क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्राविण्य प्राप्त व सहभागी खेळाडूंना तसेच त्यांचे संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांना व प्रस्तुत विद्यापीठातील सर्व सांविधीक अधिकारी यांना विद्यापीठाकडून ब्लेझर देण्यासाठी हस्तपोच निविदा मागविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व AIU आयोजित विविध क्रीडा स्पर्धा, क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्राविण्य प्राप्त व सहभागी खेळाडूंना तसेच त्यांचे संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांना व प्रस्तुत विद्यापीठातील सर्व सांविधीक अधिकारी यांना विद्यापीठाकडून ब्लेझर देण्यासाठी हस्तपोच निविदा मागविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच AIU आयोजित विविध क्रीडा स्पर्धा, क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्राविण्य प्राप्त व सहभागी खेळाडूंना व त्यांचे संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांना प्रत्येक क्रीडा दिनी ब्लेझर देण्यात यावेत व प्रस्तुत विद्यापीठातील सर्व सांविधीक अधिकारी व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य यांना फक्त याच वर्षी क्रीडा दिनी ब्लेझर देण्यात यावेत असेही सर्वानुमते ठरले. | |
| | आयत्या वेळेचा विषय क्र. २०(२) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत प्रस्तुत विद्यापीठात आंतर-विद्यापीठीय महिला क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत प्रस्तुत विद्यापीठात आंतर-विद्यापीठीय शिक्षकेत्तर कायम महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | १) दि.०३ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९८ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि.१० जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९९ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १) दि.०३ जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९८ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२) दि.१० जून, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९९ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **विद्यापीठ स्तरावर एक सर्वसमावेशक पर्यावरण संरक्षण समिती गठीत केलेली बाब माहीतीस्तव.** | भूशास्त्र संकूल |

टिपणी : वरील विषयानुसार दि.११ मार्च व १२ मार्च २०२५ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीमधील विषय क्र.१३, वर झालेला ठराव डॉ.मंगेश मोहन वेदपाठक ऐवजी श्री.चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी "विद्यापीठामध्ये व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये होणारे सर्व कार्यक्रम पर्यावरण पूरक शैलीने पार पाडावेत, समाजामध्ये पर्यावरण जागृती व परिस्थिती परीवर्तनासाठी काही प्रयत्न व्हावेत, यासाठी काही अल्पकालीन व दीर्घकालीन योजना व त्या संबंधीची मार्गदर्शन तत्वे व त्याचे पर्यवेक्षण व्हावेत अशा प्रकारे सदर ठरावाचा प्रस्ताव मांडला.उक्त प्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.

१) यासाठी वरील प्रमाणे विद्यापीठ स्तरावर एक सर्वसमावेशक पर्यावरण संरक्षण समिती मा. कुलगुरू महोदय यांनी नामनिर्देशन केल्याप्रमाणे गठीत केलेली आहे.
२) गठीत केलेल्या समितीतील सदस्यांना पत्र पाठविण्यात आलेले आहेत.
३) त्यानंतर विद्यापीठ पर्यावरण संरक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जून जागतिक पर्यावरण दिन रोजीच्या निमित्ताने विद्यापीठ विस्तारीत परिसर (नवीन परिसर) मध्ये मा.कुलगुरू महोदय यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आलेले आहे.
४) सभा व निवडणुका विभागास पाठवलेला कार्यवाही अहवाल दि.२७/०६/२०२५ वरीलप्रमाणे मा. अधिसभेने केलेला ठराव मा.व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

पर्यावरण संरक्षण समिती (विद्यापीठ परिसर व संलग्नीत महाविद्यालय)

| अ.क्र. | पद | नामनिर्देशन |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | मा.कुलगुरू |
| २ | सदस्य | श्री.प्रविण तळे (सृष्टी इको फांउडेशन सोलापूर) |
| ३ | सदस्य | श्रीमती रेश्मा माने (युगंधर फांउडेशन सोलापूर) |
| ४ | सदस्य | डॉ.राजेंद्र वडजे रा.से.यो. (NSS) |
| ५ | सदस्य | श्री.गिरीष कुलकर्णी- विद्यापीठ अभियंता |
| ६ | सदस्य | श्री.महेंद्र घोगरे हरित मित्र परिवार पुणे. |
| ७ | सदस्य | श्रीमती चंद्रीका चौहान उद्योगवर्धिनी सोलापूर |
| ८ | सदस्य सचिव | डॉ.विनायक धुळप संचालक भुशास्त्र संकुल तथा विभागप्रमुख पर्यावरणशास्त्र विभाग |

सबब, उपरोक्तप्रमाणे सर्वसमावेशक पर्यावरण संरक्षण समिती गठीत केलेली बाब माहीतीस्तव.

ठराव: **विद्यापीठ स्तरावर एक सर्वसमावेशक पर्यावरण संरक्षण समिती गठीत केल्याबाबतची नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार, मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल सादर.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार, मा. कुलसचिव यांनी विद्यापीठाचा प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन माहे दि. ०१ जोनवारी, २०२५ ते ३० जून, २०२५ या कालावधीतील मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाचा विकास कार्यक्रमांचा अहवाल सादर. | कुलसचिव कार्यालय |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार मा. कुलसचिव यांनी विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५ ] | **प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व कॉम्प्युक्स टेक्नॉलॉजी ॲनालिटीक्स प्रा. लि., मुंबई या संस्थासमवेत विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांस सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ.** | कौशल्य विकास केंद्र |

टिपणी: कौशल्य विकास केंद्राची स्थापना शैक्षणिक वर्ष २००५ पासून केलेली असून कौशल्य विकास केंद्रामार्फत सध्यस्थितीत वेगवेगळ्या विद्याशाखेचे कौशल्याधारित १४३ अभ्यासक्रम चालविले जातात. प्रस्तुत विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राच्या कार्याची दखल राज्य शासनाच्या स्तरावर घेण्यात आलेली आहे.

सोलापूर जिल्हा परीक्षेत्र व परीक्षेबाहेर सामंजस्य करार द्वारे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्राप्त झालेला सामंजस्य करार प्रस्ताव हा MoU Cell कडून तपासून घेणे तसेच कौशल्य विकास केंद्राच्या नवीन नियमावली प्रमाणे प्रस्तावाची छाननी व स्थानिक चौकशी समिती मार्फत तपासणी होणे आवश्यक आहे.

कॉम्प्युक्स टेक्नॉलॉजी ॲनालिटीक्स प्रा. लि., मुंबई या संस्थेकडून प्राप्त प्रस्तावाची कौशल्य विकास केंद्राच्या नवीन नियमावलीनुसार मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेअंती गठीत करण्यात आलेल्या छाननी समितीकडून दि.१९/०५/२०२५ रोजी कागदपत्रांची तपासणी करण्यात आली आहे. छाननी समितीने नमूद केलेल्या त्रुटींची संबंधित संस्थेकडून पूर्तता करुन घेण्याच्या अधिन राहून शिफरास केली असून दि.०२/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्रुटी पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले होते. संबंधित संस्थेने दि.१० जून, २०२५ रोजीच्या ईमेलद्वारे नमूद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केली आहे.

दि.०२/०७/२०२५ रोजी स्थानिक चौकशी समितीने कॉम्प्युक्स टेक्नॉलॉजी ॲनालिटीक्स प्रा. लि., मुंबई या संस्थेस प्रत्यक्षात भेट दिली आहे. समितीने भेटीअंती विनाअट खालील नमूद अभ्यासक्रम सामंजस्य करार अंतर्गत सुरु करण्यासाठी सामंजस्य करार (MoU) करण्याची शिफारस केली आहे.

| No. | Program Name | Course Fee | Exam fee | Total | Duration |
|---|---|---|---|---|---|
| १ | Foundations Certification Course in Generative AI | १४००० | ४००० | १८००० | ६ Months |
| २ | Foundations Certification Course in Machine Learning | १४००० | ४००० | १८००० | ६ Months |
| ३ | Foundations Certification Course in Deep Learning | १४००० | ४००० | १८००० | ६ Months |

सदरील प्राप्त सामंजस्य करार प्रस्ताव हा MoU Cell कडून तपासून घेणे आवश्यक असल्याने तपासणी करिता पाठविण्यात आला होता. दि. २१/०७/२०२५ रोजी झालेल्या समितीच्या बैठकीतील ठराव क्र. ०२ नुसार MoU Cell ने सूचविलेल्या शिफारसी/दुरूस्ती करुन आवश्यक त्या बाबींची कार्यवाही विभागाने आपल्या स्तरावरुन पूर्ण करुन घेण्याबाबत कळविले आहे. MoU Cell ने सूचविलेल्या शिफारसी/दुरुस्ती या सामंजस्य करार मध्ये करण्यात आलेल्या आहेत.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व कॉम्प्युक्स टेक्नॉलॉजी ॲनालिटीक्स प्रा. लि., मुंबई या संस्थासमवेत विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांस सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्र व कॉम्प्युक्स टेक्नॉलॉजी ॲनालिटीक्स प्रा. लि., मुंबई या संस्थेसमवेत विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांस सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ६ ]</td><td>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२८ (१) व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ परीनियम क्र.४ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या २१ व्या दीक्षांत समारंभामध्ये मार्च/एप्रिल २०२५ अखेर (पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या विद्यार्थ्यांना) सर्व विद्याशाखेमधील ज्या व्यक्ती/विद्यार्थी पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींना पदवी, पदविका, आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्याची विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, विद्यावाचस्पती पदवी प्रदान करणे याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये खालील प्रमाणे तरतूदी आहेत.
<table>
<tr><td>कलम १२८ (१)</td><td>"व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरु आणि प्रदान करता येतील."</td></tr>
<tr><td>कलम १३०</td><td>"विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा, पदव्या, पदव्युत्तर पदविका प्रदान करण्याकरिता किंवा इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता परिनियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या रीतीने, शैक्षणिक वर्षातून किमान एकदा करण्यात येईल"</td></tr>
</table>
उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या दि. १०/१०/२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्रकाशित करण्यात आलेल्या एकरुन परिनियम क्र. ४ मधील अ. क्र. ५ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ मध्ये खालील प्रमाणे तरतुदी आहेत.<br>क्र. ४ - दीक्षांत समारंभापूर्वीच्या बैठकीमध्ये विद्यापरिषद, ज्या व्यक्ती पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींच्या नावांची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करील. विद्यापरिषदेच्या शिफारशीवरुन, व्यवस्थापन परिषद, अशा पात्र व्यक्तींना अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याकरिता मान्यता देईल.<br>क्र. ५ - विद्यापीठ अनुदान आयोगाकडुन विनिर्दिष्ट करण्यात आणि अधिनियमाच्या तरतूदीनूसार विद्यापीठाकडून संस्थापित करण्यात आल्याखेरीज, कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यात येणार नाही. अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी आदेशाद्वारे विहित करण्यात येतील.<br>उपरोक्त महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कायद्यातील कलम १२८(१) व कलम १३० नूसार आमागी २१ व्या दीक्षांत समारंभाची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने, व उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या दि.१०/१०/२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्रकाशित करण्यात आलेल्या एकरुप परिनियम क्र. ४ मधील क्र. ५ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप</td><td>परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग</td></tr>
</table>

परिनियम २०१८ मधील तरतुदीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाकडुन विनिर्दिष्ट करण्यात आणि अधिनियमाच्या तरतूदीनूसार विद्यापीठाकडून संस्थापित करण्यात आलेल्या विविध पदवी, पदविका, प्रमाणपत्र व विद्याविषयक विशेषोपाधी यांची अभ्यासक्रमाची यादी प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नता व अभ्यासमंडळे विभागाकडून प्राप्त झाली आहे.

उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेकामी दि. २८ जुलै, २०२५ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र. ५३ नूसार विषय सादर करण्यात आला सदरील विषयास अनुसरुन विद्यापरिषदेने खालील प्रमाणे ठराव पारित केला आहे.

| |
|---|
| महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२८ (१) व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ परीनियम क्र.४ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या २१ व्या दीक्षांत समारंभामध्ये मार्च/एप्रिल २०२५ अखेर (पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या विद्यार्थ्यांना) सर्व विद्याशाखेमधील ज्या व्यक्ती/विद्यार्थी पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींना पदवी, पदविका, आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२८ (१) व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ परीनियम क्र. ४ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या २१ व्या दीक्षांत समारंभामध्ये मार्च/एप्रिल २०२५ अखेर (पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या विद्यार्थ्यांना) सर्व विद्याशाखेमधील ज्या व्यक्ती/विद्यार्थी पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींना पदवी, पदविका, आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्याची विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ.

ठराव: **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२८ (१) व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ परीनियम क्र.४ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या २१ व्या दीक्षांत समारंभामध्ये मार्च/एप्रिल २०२५ अखेर (पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या विद्यार्थ्यांना) सर्व विद्याशाखेमधील ज्या व्यक्ती/विद्यार्थी पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींना पदवी, पदविका, आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७ ] | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार, सन २०२४-२५ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवाल संदर्भात दि.२०/०८/२०२५ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता M/s.SKVM & COMPANY, सोलापूर यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या मान्येतेने नियुक्ती करण्यात आली होती. M/s.SKVM & COMPANY, सोलापूर यांनी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन वेळेत लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे.<br>लेखापरिक्षीत लेखे, लेखापरिक्षण अहवाल दि.२०/०८/२०२५ रोजी वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय क्रं. अन्वये सादर केला असता, त्यावर विचारविनिमय होऊन खालील प्रमाणे मान्यतेची शिफारस करण्यात आली.<br>ठराव:<br>सबब, वित्त व लेखा समितीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल स्विकारुन वरीलप्रमाणे केलेली मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार स्विकारुन मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार, सन २०२४-२५ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवाल संदर्भात दि.२०/०८/२०२५ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ८ ] | मा. विद्यापरिषदेच्या दि. ०३/०९/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र. १०२(३) अन्वये स्वायत्त महाविद्यालययाची नियमावली तयार करण्यासाठी गठित केलेल्या समितीचा अहवाल स्विकारुन दि.२८ मे २०२५ रोजी झालेल्या विद्यापीरषदेच्या तातडीच्य बैठकीत स्वायत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची महिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी शुल्क आकारण्यासाठी सर्वानुमते दुरूस्तीसह प्रति विद्यार्थी रु.२००/- व तसेच विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांसाठीचे नांव छापण्यात यावे. विद्यापीठाकडून स्वायत्त नसलेल्या महाविद्यालयांना विहीत केलेल्या पदवी प्रमाणपत्र शुल्कापेक्षा रू.३००/- (रुपये तीनशे फक्त) ज्यादा शुल्क आकारण्यात यावे अशी मान्यता देण्यात आली आहे सदरचा विषय विचारार्थ.<br>टिपणी: मा. विद्यापरिषदेच्या दि. ०३/०९/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र. १०२(३) अन्वये स्वायत्त महाविद्यालययाची नियमावली तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा अहवाल स्विकारुन दि.२८मे २०२५ रोजी झालेल्या विद्यापीरषदेच्या तातडीच्य बैठकीत स्वायत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी शुल्क आकारण्यासाठी सर्वनुमते दुरूस्तीसह प्रति विद्यार्थी रु.२००/- तसेच विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांसाठीचे नांव छापण्यात यावे. विद्यापीठाकडून स्वायत्त नसलेल्या महाविद्यालयांना विहीत केलेल्या पदवी प्रमाणपत्र शुल्कापेक्षा रू.३००/- (रुपये तीनशे फक्त) ज्यादा शुल्क आकारण्यात यावे. अशी मान्यता देण्यात आली आहे.<br>राज्य शासनाच्या आदेशाच्या अधिन राहुन स्वायत्त महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठामार्फत पोर्टलवर अपलोड करण्यासाठी प्रति विद्यर्थी प्रति वर्ष रु.२००/- शुल्क आकारण्यात यावे व विद्यापीठाकडून स्वायत्त नसलेल्या महाविद्यालयांसाठी विहित केलेल्या पदवी प्रमाण पत्र शुल्का पेक्षा रु. ३००/- जादाचे शुल्क आकराण्यात यावे यासाठी अंकेक्षणाच्या दृष्टीने वेगळे शिर्षक (Head) देण्यात यावे असे ठरले.<br>मा. विद्यापरिषदेच्या दि. ०३/०९/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र. १०२(३) अन्वये स्वायत्त महाविद्यालययाची नियमावली तयार करण्यासाठी गठित केलेल्या समितीचा अहवाल स्विकारुन दि.२८मे २०२५ रोजी झालेल्या विद्यापीरषदेच्या तातडीच्य बैठकीत स्वायत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची महिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी शुल्क आकारण्यासाठी सर्वनुमते दुरूस्तीसह प्रति विद्यार्थी रु.२००/- व तसेच विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांसाठीचे नांव छापण्यात यावे. विद्यापीठाकडून स्वायत्त नसलेल्या महाविद्यालयांना विहीत केलेल्या पदवी प्रमाणपत्र शुल्कापेक्षा रू.३००/- (रुपये तीनशे फक्त) ज्यादा शुल्क आकारण्यात यावे. अशी मान्यता देण्यात आली आहे, सदरचा विषय विचारार्थ. | पात्रता विभाग |
| ठराव: | स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी प्रति विद्यार्थी रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) शुल्क आकारण्यास व विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांना विहीत केलेल्या पदवी प्रमाणपत्र शुल्कापेक्षा रू.३००/- (रुपये तीनशे फक्त) ज्यादा शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ९ ] | **प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून "जोडीदाराची विवेकी निवड" हा कार्यक्रम राबविण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर या संस्थेसोबत सहचर्य करार (MoU) करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर संस्थेमार्फत प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमूधन "जोडीदाराची विवेकी निवड" हा कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. शाळा, कॉलेजेस मधून राष्ट्राचे भवितव्य घडत असते. या जाणीवेतून रोटरी क्लब जुळे सोलापूर महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थी यांच्याबरोबर विविध उपक्रमांमधून विवेकी समाज निर्मितीसाठी कार्यरत आहे. जोडीदार निवडीच्या टप्प्यावर असलेल्या तरुण-तरुणीसोबत या प्रक्रियेविषयी संवाद करता यावा, म्हणून रोटरी क्लब जुळे सोलापूरने "जोडीदाराची विवेकी निवड" हा उपक्रम मागील अनेक वर्षापासून सुरु केलेला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून जोडीदार निवडीसंदर्भात तरुणाईला प्रशिक्षीत केले जाते. सदर उपक्रमाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.<br>१) प्रेम आणि आकर्षण यातील फरक लक्षात घेणे.<br>२) बौध्दिक, भावनिक, मूल्यात्मक व लैगिंकता विषयक अनुरुपता पाहणे.<br>३) हुंडा, व्यसनाला ठाम नकार देणे, पत्रिकेची वैज्ञानिक माहिती देवून त्याबाबत सम्यक विचार कसा केला पाहिजे ते सांगणे.<br>४) लग्न साधेपणाने म्हणजे किमान कर्ज न काढता करणे.<br>५) लग्नाबाबत जातीचा विचार का केला जातो त्याची समीक्षा कशी करावी हे समजाऊन सांगणे.<br>सदर उपक्रम हा विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायक ठरु शकतो व त्या योगे एक चांगली सुसंस्कृत व उत्तम विचार करणारी युवा पिढी घडू शकते असा विश्वास आहे. सदर उपक्रम राबविण्यासाठी विद्यापीठावर कोणत्याही स्वरुपाचा आर्थिक बोजा पडणार नसून सदर उपक्रम हा इतर विद्यापीठांसाठी देखील एक पथदर्शी उपक्रम ठरु शकेल असे वाटते.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून "जोडीदाराची विवेकी निवड" हा कार्यक्रम राबविण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर या संस्थेसोबत सहचर्य करार (MoU) करण्याची बाब विचारार्थ. | आरोग्य केंद्र |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून "जोडीदाराची विवेकी निवड" हा कार्यक्रम राबविण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर या संस्थेसोबत सहचर्य करार (MoU) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून Youth Empowerment & Skills Plus (YES!+) हा कार्यक्रम राबविण्यासाठी The Art of Living (TAOL) या संस्थेसोबत सहचर्य करार (MoU) करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: The art of Living (TAOL) संस्थेमार्फत प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून Happiness Program अंतर्गत Youth Empowerment & Skills Plus (YES!+) हा कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेला होता. सदर Youth Empowerment & Skills Plus (YES!+) कार्यक्रम हा विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मानसिक आरोग्य वृधिंगत करण्यासाठी उपयुक्त ठरु शकतो. तसेच प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून Youth Empowerment & Skills Plus (YES!+) हा कार्यक्रम राबविण्यासाठी विद्यापीठावर कोणत्याही स्वरुपाचा आर्थिक बोजा पडणार नाही.<br>ही संस्था देशातील नामांकित संस्था असून देशातील अनेक विद्यापीठांमधून सदर संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी Youth Empowerment & Skills Plus (YES!+) कार्यक्रम राबविला जात असून प्रस्तुत विद्यापीठातून अशा प्रकारचा कार्यक्रम राबविला गेल्यास त्याचा फायदा विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना होवू शकतो.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून Youth Empowerment & Skills Plus (YES!+) हा कार्यक्रम राबविण्यासाठी The Art of Living (TAOL) या संस्थेसोबत सहचर्य करार (MoU) करण्याची बाब विचारार्थ. | आरोग्य केंद्र |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधून Youth Empowerment & Skills Plus (YES!+) हा कार्यक्रम राबविण्यासाठी The Art of Living (TAOL) या संस्थेसोबत सहचर्य करार (MoU) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **दि.१९/०८/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतात दि.२०/०८/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत वित्त व लेखा समितीने दुरुस्त केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: दि.१९/०८/२०२५ रोजी झालेल्या खरेदी समितीचा बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेची मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार खरेदी समितीचा कार्यवृत्तांत दि.२०/०८/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीसमोर ठेवण्यात आला होता. त्यास वित्त व लेखा समितीने ठराव क्र. ३ मध्ये दुरुस्तीसह संपूर्ण कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.<br>सबब, दि.१९/०८/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतात दि.२०/०८/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत वित्त व लेखा समितीने दुरुस्त केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **दि.१९/०८/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतात दि.२०/०८/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत वित्त व लेखा समितीने दुरुस्त केलेल्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या दि.२२/०७/२०२५ रोजी झालेल्या २९ व्या बैठकीचा कार्यवृत्तात मान्यतेस्तव.**<br>टिपणी: कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या दि.२२/०७/२०२५ रोजी झालेल्या २९ व्या बैठकीमध्ये पुढील विषय होते. १) दि.२८/०३/२०२५ रोजी झालेल्या ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत २) सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाचा ज्ञानस्त्रोत केंद्राचा वार्षिक अहवाल ३) PM-USHA प्राप्त निधीमधून e-resources (Chemical Abstracts, Scopus database) खरेदी करणेची बाब ४) PM-USHA प्राप्त निधीमधून १. ACS Publication २. Pearson Publication ३. Tata MCGraw Hill ४. ProQuest e -Database इ. ई-बुक्स खरेदी करण्याची बाब ५) पी.एम.-उषा अंतर्गत प्राप्त निधीतून ज्ञानस्त्रोत केंद्राकरिता Rare manuscripts, Ramayana/ old manuscript खरेदी करणेची बाब ६) विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडील पेमेंटचा QR Code रंगभवन अभ्यासकेंद्रासाठी उपलब्ध होऊन मिळणेची बाब ७) ज्ञानस्त्रोत केंद्राकडून PM-USHA प्राप्त निधीमधून महाविद्यालयीन ग्रंथपालांकरिता कार्यशाळा आयोजित करण्याची बाब ८) प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पुस्तके जमा करण्यासाठी कालावधी वाढवून देण्याची बाब ९) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व महात्मा बसवेश्वर यांची पुस्तके खरेदी करणेची बाब १०) GOC (Good Office Committee) च्या ध्येय धोरणास अनुसरुन पुस्तके / नियतकालिके / ई- रिसोर्सेस खरेदीची बाब ११) प्रस्तुत विद्यापीठातील कायदा विभागाची पुस्तके खरेदी करण्याची बाब १२) अभ्यासकेंद्र (रंगभवन) Stock Verification करुन पुस्तके रद्दबातल करण्याची बाब इ. विषय होते.<br>सबब, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या दि. २२/०७/२०२५ रोजी झालेल्या २९ व्या बैठकीचा कार्यवृंत्तात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ कलम ९६ (५) (घ) अन्वये मान्यतेस्तव. | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्र |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९६ (५) (घ) अन्वये कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या दि.२२/०७/२०२५ रोजी झालेल्या २९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तातास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांच्या अहवालामध्ये कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्राकडून दर वर्षी किती पुस्तके खरेदी केली जातात याबाबतची माहिती सादर करण्यात यावी असेही सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | **डॉ. प्रकाश पी. वडगावंकर, Adjunct Professor, रसायनशास्त्र संकुल यांनी दि.३०/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र संकुलात त्यांना Adjunct Professor म्हणून दि.०९/०९/२०२५ पासून पुढील एक वर्षासाठी नियुक्तीचा कालावधी वाढवून देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: डॉ. प्रकाश पी. वडगावंकर यांनी दिनांक ३०/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये ते प्रस्तुत विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलात विद्यापीठाचे पत्र क्र. पुअसोविसो/आस्था/शिक्षक/२०२४/६६३६, दि.०५/०९/२०२४ अन्वये दि.०९/०९/२०२४ पासून Adjunct Professor म्हणून कार्यरत आहेत. या कालावधीत त्यांना विद्यापीठातील अध्यापक व विद्यार्थ्यांशी संवाद साधून खूप आनंद झाला असून त्यांच्या सहकार्याने एकत्रितपणे अनेक नाविन्यपूर्ण प्रकल्प/उपक्रम त्यांनी पूर्ण केले आहेत. सध्या त्यांची नियुक्ती दि. ०८/०९/२०२५ रोजी संपत आहे. शैक्षणिक उपक्रमांना पुढील स्तरावर नेण्याच्या उद्देशाने विद्यापीठात काम करण्यात त्यांना खूप रस असल्याचे नमूद करुन त्यांनी, त्यांची नियुक्ती Adjunct Professor म्हणून पुढील एक वर्षासाठी वाढवावी, अशी विंनती केली आहे. सदर विनंतीस अनुसरुन मा. संचालक, रसायनशास्त्र संकुल यांनी Strongly Recommended असे पृष्ठांकन करुन अर्ज प्रशासनास अग्रेषित केले आहेत.<br>डॉ. प्रकाश वडगावंकर यांची यापूर्वी दि.०५/०९/२०२५ रोजीच्या नियुक्ती आदेशान्वये करण्यात आलेली नियुक्ती ही दि.१३ जून, २०२४ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १७ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Guide Lines for Empanelment for Adjunct Faculty in Universities & Colleges मधील मार्गदर्शक सूचनेनुसार Adjunct Professor म्हणून महिन्यातून किमान २ वेळा कमीत कमी एकावेळी दोन दिवसांकरिता संबंधित संकुलात उपस्थित राहण्याच्या अटीवर प्रतिमाह रु. ५०,०००/- एकत्रित मानधनावर नियुक्ती करण्यास व प्रवास खर्चासाठी रु.३,०००/- याप्रमाणे डॉ. वडगावंकर यांना विद्यापीठाचे नियुक्ती आदेश क्र. पुअहोसोविसो /आस्था/शिक्षक/२०२४/६६३६, दि.०५/०९/२०२४ अन्वये Adjunct Professor म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती आदेशात नमूद प्रमाणे डॉ. प्रकाश वडगावंकर यांची नियुक्ती प्रस्तुत विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलात Adjunct Professor म्हणून दि.०८/०९/२०२५ पर्यंत आहे.<br>सबब, डॉ. प्रकाश पी. वडगावंकर, Adjunct Professor, रसायनशास्त्र संकुल यांनी दि.३०/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र संकुलात त्यांना Adjunct Professor म्हणून दिनांक ०९/०९/२०२५ पासून पुढील एक वर्षासाठी नियुक्तीचा कालावधी वाढवून देण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग (शिक्षक) |
| ठराव: | **डॉ. प्रकाश पी. वडगावंकर, Adjunct Professor, रसायनशास्त्र संकुल यांनी दि.३०/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र संकुलात त्यांना Adjunct Professor म्हणून दि.०९/०९/२०२५ पासून पुढील एक वर्षासाठी नियुक्तीचा कालावधी वाढविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४(१)] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील आरोग्य विज्ञान संकुलांतर्गत Masters in Public Health (MPH) हा नवीन व्यावसायिक स्वरुपाचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्याने सुरु झालेला असून, सदर अभ्यासक्रमाच्या अध्यापनाकरिता नेमणूक करण्यात येणाऱ्या कंत्राटी अध्यापकांचे वेतन वाढविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील आरोग्य विज्ञान संकुलात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून Masters in Public Health (MPH) हा अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आला आहे. मा. प्र. संचालक, आरोग्य विज्ञान संकुल यांनी दिनांक २१/०८/२०२५ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणी अन्वये MPH या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता २० विद्यार्थी इतकी असून आज अखेर या अभ्यासक्रमास प्रवेशासाठी २० अर्ज संकुलास प्राप्त झालेले आहेत. सदर अभ्यासक्रम स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावर चालविला जाणारा अभ्यासक्रम असल्याने प्रवेश क्षमतेमध्ये वाढ करता येवू शकेल. सदरचा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी व्यावसायिक शैक्षणिक अर्हता असलेले प्राध्यापक पात्र होत असून त्यांची शैक्षणिक पात्रता खालील प्रमाणे असणे अपेक्षित आहे.<br>Any Medical Graduate (MBBS/BAMS/BHMS/BDS) with Post Graduate Qualification in Public Health (MPH) or Post Graduate Qualification in Community Medicine (MD PSM) with NET Qualification in Social Medicine & Community Health<br>OR<br>Any Graduate with Post Graduate Qualification in Public Health (MPH) / Health Sciences (M.Sc. Health Science) & NET/Ph.D. in Public Health or Health Sciences.<br>सदर अभ्यासक्रम हा पूर्णवेळ स्वरुपाचा असल्याने शैक्षणिक शुल्क रु.४७,२१६/- इतके निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शैक्षणिक शुल्क हे शुल्क निश्चिती समितीने निश्चित केले असून सदर शुल्क निश्चित करताना सदर अभ्यासक्रमाच्या अध्यापकांसाठी खालील प्रमाणे देय वेतन निश्चित करुन त्यानुसार शैक्षणिक शुल्क ठरविण्यात आलेले होते.<br>सदर अभ्यासक्रमाच्या अध्यापकांना लागणारी शैक्षणिक अर्हता ही वैद्यकीय किंवा आरोग्य विषयक पदव्युत्तर व्यावसायिक अशी लागत असल्याने सदर कंत्राटी अध्यापकांना खालीलप्रमाणे वेतन देण्यात यावे अशी संकुलाची धारणा आहे. | आस्थापना विभाग (शिक्षक) |

| Sr. No. | Qualification of Assistant Professor for MPH Program | Present Salary in Rs. / Month | Expected Salary in Rs. / Month |
|---|---|---|---|
| 1. | Any Medical Graduate (MBBS/BAMS/BHMS/BDS) with Post Graduate Qualification in Public Health (MPH) or Post Graduate Qualification in Community Medicine (MD PSM) with NET Qualification in Social Medicine & Community Health | Rs. 30,000/- | Rs. 45,000/- |
| 2. | Any Graduate with Post Graduate Qualification in Public Health (MPH) / Health Sciences (M.Sc. Health Science) & NET/Ph.D. in Public Health or Health Sciences | Rs. 30,000/- | Rs. 50,000/- |

MPH हा अभ्यासक्रम स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावर चालणारा अभ्यासक्रम असून सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या जमा झालेल्या रकमेतून उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार कंत्राटी अध्यापकांना वाढीव वेतन देता येवू शकेल, याचा कोणताही अतिरिक्त आर्थिक भार विद्यापीठावर पडणार नाही, असे कळविले आहे.

यापूर्वी विविध शैक्षणिक संकुलातील नियमित अध्यापकांचा कार्यभार वगळून उर्वरित कार्यभाराकरिता कंत्राटी सहायक प्राध्यापक पदांसाठी दिनांक १३/०४/२०२३ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १८ (२) नुसार वेतन आदा करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील आरोग्य विज्ञान संकुलांतर्गत Masters in Public Health (MPH) हा नवीन व्यावसायिक स्वरुपाचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्याने सुरु झालेला असून, सदर अभ्यासक्रमाच्या अध्यापनाकरिता नेमणूक करण्यात येणाऱ्या कंत्राटी अध्यापकांचे वेतन वाढविण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील आरोग्य विज्ञान संकुलांतर्गत Masters in Public Health (MPH) हा नवीन व्यावसायिक स्वरुपाचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्याने सुरु झालेला असून, सदर अभ्यासक्रमाच्या अध्यापनाकरिता नेमणूक करण्यात येणाऱ्या कंत्राटी अध्यापकास दरमहा ₹३५,०००/- इतके वेतन अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४(२)] | **दि.११/०७/२००९ पूर्वी एम. फिल पदवी पूर्ण केलेल्या आणि दि.१४/०६/२००६ किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या नियमित/कायमस्वरुपी सेवेत असलेल्या शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) मधून सूट देण्यात आल्याने सदर शिक्षकांच्या स्थाननिश्चितीकरिता मागविण्यात येणाऱ्या स्टेज निहाय प्रस्तावाच्या शुल्क वाढीची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भीय पत्रान्वये दि.११/०७/२००९ पूर्वी एम. फिल पदवी पूर्ण केलेल्या आणि दि.१४/०६/२००६ किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या नियमित/कायमस्वरुपी सेवेत असलेल्या शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) मधून सूट देण्याचा निर्णय, आयोगाने दि.२४/०६/२०२५ रोजी झालेल्या ५९१ व्या बैठकीत घेण्यात आला आहे. असे विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.०२/०७/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कळविले असून पत्रा सोबत त्यांनी शिक्षकांची यादी जोडून पाठविलेली आहे असे संदर्भ क्र. १ अन्वये कळविले आहे.<br>संदर्भ क्र. २ अन्वये मा. विभागीय सहसंचालक यांनी संदर्भ क्र. १ अन्वये कळविल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याबाबत कळविले आहे.<br>त्यानुषंगाने विद्यापीठ संलग्नित २६ शिक्षकांना (सोबत यादी) दि.११/०७/२००९ पूर्वी एम.फिल पदवी पूर्ण केलेल्या आणि दि.१४/०६/२००६ किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या, नियमित/कायमस्वरुपी सेवेत असलेल्या शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) मधून सूट देण्यात आल्याचे संबंधित शिक्षकांच्या महाविद्यालयास पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.<br>युजीसीने मान्यता दिलेल्या २६ शिक्षकांचे स्थाननिश्चितीचे प्रत्येक स्टेज निहाय स्टेज १, स्टेज २ स्टेज ३ आणि स्टेज ४ चे प्रस्ताव मागवावे लागणार आहेत. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रथमत: प्रस्तावाची छाननी करावी लागेल. तदनंतर सदर प्रस्तावासाठी शिबिराचे आयोजन करावे लागणार आहे. यासाठी प्रत्येक स्टेज साठी म्हणजे स्टेज १, स्टेज २ स्टेज ३ आणि स्टेज ४ साठी प्रस्ताव शुल्क आकारणी करावी लागणार आहे. सदर प्रक्रियेमध्ये छाननी आणि शिबिराकरिता येणार खर्च हा सद्यस्थिती आकारण्यात येणारे प्रती प्रस्ताव रु.५०००/- शुल्क असून त्यामध्ये वाढ करावी लागणार आहे.<br>सबब, दि.११/०७/२००९ पूर्वी एम.फिल पदवी पूर्ण केलेल्या आणि दि. १४/०६/२००६ किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या, नियमित/कायमस्वरुपी सेवेत असलेल्या शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) मधून सूट देण्यात आल्याने सदर शिक्षकांच्या स्थाननिश्चितीकरिता मागविण्यात येणाऱ्या स्टेज निहाय प्रस्तावाच्या शुल्क वाढीची बाब विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग-२ |
| ठराव: | **दि.११/०७/२००९ पूर्वी एम. फिल पदवी पूर्ण केलेल्या आणि दि.१४/०६/२००६ किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या नियमित/कायमस्वरुपी सेवेत असलेल्या शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) मधून सूट देण्यात आल्याने सदर शिक्षकांच्या स्थाननिश्चितीकरिता मागविण्यात येणाऱ्या प्रत्येक स्टेज निहाय ₹७,५००/- इतके शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४(३)] | दिनांक १९/०८/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृतांत विचारार्थ.<br><br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दिनांक १९/०८/२०२५ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br><br>विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे.<br><br>सबब, दिनांक १९/०८/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृतांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | दिनांक १९/०८/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृतांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br><br>• विषय क्र. ४ मध्ये Sound System, Acoustic System, Light System व Three Curtens इ. साठी ₹१.५० कोटी इतक्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४(४)] | **प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्म सोबत केलेला करार दि.११/०८/२०२५ रोजी संपुष्टात आला आहे. दि.०८/०८/२०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ऑनलाईन बैठकीच्या ठरवाच्या अनुषंगाने गठित समितीच्या अहवालानुसार सदर फर्मला दि.१२/०८/२०२५ पासून तीन महिन्याची मुदतवाढ दिलेली आहे, तथापि, एकुण ११ महिने मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्म सोबत केलेला करार दि.११/०८/२०२५ रोजी संपुष्टात आला आहे. दि.०८/०८/२०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ऑनलाईन बैठकीच्या ठरवाच्या अनुषंगाने गठित समितीच्या अहवालानुसार सदर फर्मला दि.१२/०८/२०२५ पासून तीन महिन्याची मुदतवाढ देऊन नवीन ई- टेंडरची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्म सोबत केलेला करार दि.११/०८/२०२५ रोजी संपुष्टात आला आहे. दि.०८/०८/२०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ऑनलाईन बैठकीच्या ठरवाच्या अनुषंगाने गठित समितीच्या अहवालानुसार सदर फर्मला दि.१२/०८/२०२५ पासून तीन महिन्याची मुदतवाढ दिलेली आहे, तथापि, एकुण ११ महिने मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्म सोबत केलेल्या करारास पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार ११ महिने मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४(५)] | **प्रस्तुत विद्यापीठातील कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक यांना देण्यात येणारा जादा कामाचा मोबदला मध्ये रु.३०/- प्रति तास वरुन रु.९०/- प्रति तास इतकी वाढ करुन मिळणेबाबत केलेली विनंती विचारार्थ.**<br>टिपणी: मा. कुलगुरु व मा. प्र- कुलगुरु कार्यालय येथे कार्यरत अंगरक्षक यांनी कार्यालयीन वेळेपेक्षा सकाळी लवकर व संध्याकाळी उशीर पर्यंत थांबावे लागते या कालावधीतील जादा कामाचा मोबदला रु.३०/- मिळतो. परंतु वाढती महागाई पाहता विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे किमान तासाला रु.९०/- रुपये जादा कामाचा मोबदला मिळणेबाबत संबधित फर्मला पत्रव्यवहार केला आहे.<br>याबाबत सादर करण्यात येते की, संदर्भ क्र.०२ नुसार प्रस्तुत विद्यापीठाचे शिक्षकेतर सेवकांसाठी अधिकच्या कामाचा भत्ता सुधारित दराने आदा करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेऊन त्याच्या नियमावलीसहीत परिपत्रक पारित करण्यात आले होते. सदर परिपत्रका सोबत जोडलेल्या नियमावलीतील हंगामी व रोजंदारी कर्मचारी करिता नमूद करण्यात आलेला नियम पुढील प्रमाणे आहे.<br>नियम क्र. १३ हंगामी व रोजंदारी जादा वेळ कामचा भत्ता देण्यात येऊ नये. त्याऐवजी त्यांना त्याच वर्षात पर्यायी सुट्टी द्यावी. (सोबत परिपत्रकाची छायांकित प्रत माहितीस्तव जोडली आहे.) तसेच संदर्भ क्र.३ नुसार नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अतिकालीक भत्त्यामध्ये (Overtime) दि.०१/०४/२०२४ पासून वाढ करण्याचा ठराव पारीत केला असून त्यानुसार सुधारित दर व त्याअनुषंगाने वर्ग -४ (वाहनचालक वगळून) रु.९०/- इतका करण्यात आला आहे.<br>तसेच मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम प्रा.लि. पुणे यांच्यासमवेत झालेल्या करारामधील मुद्दा क्र. २२ मध्ये कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक ज्या-ज्या दिवशी काम केलेले आहे, त्याप्रमाणे वेतन दिले जाईल. तसेच सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक यांनी जादा काम केल्यास त्यांना जादा कामाचा मोबदला विद्यापीठाने विहित केल्याप्रमाणे राहील. त्याअनुरोधाने संदर्भ क्र. ०४ प्रमाणे जादा कामाचा मोबदला रु.३०/- प्रति तास आदा करण्यात आला होता.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक यांना देण्यात येणारा जादा कामाचा मोबदला मध्ये रु.३०/-प्रति तास वरुन रु.९०/- प्रति तास इतकी वाढ करुन मिळणेबाबत केलेली विनंती विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **मा. कुलगुरु व मा. प्र-कुलगुरु कार्यालय येथे कार्यरत अंगरक्षक यांना देण्यात येणाऱ्या जादा कामाचा मोबदलामध्ये रु.३०/-प्रति तास वरुन रु.६०/- प्रति तास इतकी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [१४(६)] | आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना काही प्रमाणात आर्थिक मदत करण्याबाबत दि.११/११/२०२४ रोजीच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या बैठकीत विषय क्र.५(१) वर झालेला ठराव सर्वानुमते स्विकारण्यात आला. शै. वर्ष २०२४-२५ पासून १० लाखाची तरतूद करण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना काही प्रमाणात आर्थिक मदत करण्याबाबत दि.११/११/२०२४ रोजीच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या बैठकीत विषय क्र.५(१) वर झालेला ठराव सर्वानुमते स्विकारण्यात आला. शै. वर्ष २०२४-२५ पासून १० लाखाची तरतूद करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>तसेच याबाबत खेळाडूंचे अर्ज आल्यास याकामी निधी मंजूर करण्याचे सर्वाधिकार मा.कुलगुरु महोदय यांना देण्यात आले. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद